# १५. वाढदिवस

* **वाचा.**

बाई वर्गात आल्या. त्यांनी वर्गाकडे एक नजर टाकली. समोरच्याच बाकावर रमेश बसला होता. दररोज शाळेचा गणवेश घालणारा रमेश आज रंगीत कपडे घालून आला होता. आज रमेशचा वाढदिवस, हे बाईंनी ओळखले. बाईंनी रमेशला पुढे बोलावले.

बाई म्हणाल्या, ‘‘मुलांनो! आज रमेशचा वाढदिवस आहे. आपण त्याला टाळ्या वाजवून शुभेच्छा देऊया.’’ सर्व मुलांनी रमेशला शुभेच्छा दिल्या.



‘‘आपला वाढदिवस साजरा झाला, की आपल्याला आनंद वाटतो; पण तुम्ही इतरांचे वाढदिवस साजरे करता का?’’ बाईंनी विचारले. वर्गातील बहुतेक मुलांनी ‘होऽऽ’ म्हणत हात वरती केले. बाई रमेशकडे बघून म्हणाल्या, ‘‘रमेश तू सांग बरं, कोणाचा वाढदिवस साजरा केलास ते.’’

रमेश म्हणाला, ‘‘आईबाबा दरवर्षी आमचे



वाढदिवस आनंदात साजरे करतात. ते आम्हांला भेटवस्तू देतात. माझ्या बाबांचं बालपण गरिबीत गेलं. त्यांच्या बालपणात त्यांचे वाढदिवस कुणी साजरे केले नाहीत. यावर्षी मी आणि ताईनं ठरवलं, ‘आपण बाबांचा वाढदिवस साजरा करायचा.’ माझ्या ताईनंच नियोजन केलं. तिनं केक आणला. मी छानसं भेटकार्ड तयार केलं. दोघांनी मिळून घरात सजावट केली. आम्ही बागेतल्या फुलांचा छान गुच्छ तयार केला. आईनं बाबांच्या आवडीचे पदार्थ केले. आम्ही सर्वांनी बाबांचा वाढदिवस आनंदात साजरा केला. बाबांना आमचं कौतुक वाटलं. वाढदिवस बाबांचा झाला, पण बक्षीस मात्र आम्हां दोघांना मिळालं.’’

बाई म्हणाल्या, ‘‘मुलांनो ! रमेश आणि त्याच्या ताईने त्यांच्या बाबांचा वाढदिवस किती छान साजरा केला!’’

बाईंनी रमेशचे कौतुक केले.

## स्वाध्याय

**प्र. १. खालील प्रश्नांची उत्तरे सांगा व लिहा.**

(अ) ‘आज रमेशचा वाढदिवस आहे,’ हे बाईंनी कसे ओळखले?

(आ) रमेशचा वाढदिवस साजरा करण्यासाठी बाईंनी काय केले?

(इ) वाढदिवस साजरा केला, म्हणजे मुलांना काय वाटते?

(ई) वाढदिवस साजरा करण्याबद्दल बाईंनी कोणाला प्रश्न विचारला?

(उ) रमेशने बाबांच्या वाढदिवसाला काय तयार केले?

(ऊ) वाढदिवसासाठी ताईने काय आणले?

**प्र. २. तुमच्या मनाने उत्तरे सांगा.**

(अ) तुमच्या घरी कोणाकोणाचे वाढदिवस साजरे करतात? कसे करतात?

(आ) तुमच्या शाळेत/वर्गात तुमचे वाढदिवस साजरे करतात का? कसे करतात?

**प्र. ३. खालील शब्दसमूह वापरून वाक्ये लिहा.**

(अ) आनंद वाटणे (आ) साजरा करणे (इ) कौतुक करणे (ई) टाळ्या वाजवणे

**प्र. ४. वाचा. हे शब्द असेच लिहा.**

वर्गात, सर्वांना, टाळ्या, शुभेच्छा, यावर्षी, कौतुक, बक्षीस.

**प्र. ५. तुम्ही तुमचा वाढदिवस कसा साजरा करता ते सांगा.**

- **वाचा.**

आमच्या शेजारी शिंदे आजोबांचं घर आहे. त्यांचा मुलगा परगावी नोकरी करतो. आजोबा व आजी गावीच राहतात. आजोबा सामान आणायला मार्केटमध्ये गेले, की एखादी तरी गोष्ट विसरतात. आजींना ती वस्तू लगेच हवी असते. आजोबा मला हाक मारतात अन् विचारतात, 'देतोस का रे आणून?' मी पळत पळत जाऊन त्यांची वस्तू आणून देतो. आजीला फळीवरच्या वस्तू काढून द्यायचं काम माझंच असतं. आजोबांना रात्रीचं डोळ्यांनी कमी दिसतं, म्हणून आजोबा मला बऱ्याचवेळा हाक मारतात. मी त्यांना मदत करतो.

आईबाबा बाहेर गेल्यावर मला याच आजीआजोबांचा आधार असतो. आजी मला खूप छानछान गोष्टी सांगते, तर आजोबा त्यांच्या लहानपणीच्या आठवणी सांगतात. ते ऐकताना मला खूपच मजा येते. एखादं गणित सुटलं नाही किंवा शब्दांचा अर्थ समजला नाही, तर मी आजोबांकडे जातो. आजोबा बाहेर गेले, की आठवणीनं माझ्यासाठी खाऊ आणतात. आमच्या गल्लीतले सगळे मला शिंदे आजोबांचाच नातू समजतात.

- **खालीलप्रमाणे विविध आकारांची, रंगांची भेटकार्डे तयार करा. विविध सण, वाढदिवसाच्या दिवशी आपल्या मित्रमैत्रिणींना भेट द्या.**







**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून या पाठाचे प्रकट वाचन करून घ्यावे. विद्यार्थी ज्या ठिकाणी वाचताना अडखळतील त्या ठिकाणी त्यांना मदत करावी. या पृष्ठावर दिलेला उतारा पूरक वाचनासाठी दिलेला आहे. त्याचे प्रकट वाचन करून घ्यावे. तसेच त्या उताऱ्यातील परिच्छेदाचे अनुलेखन करून घ्यावे.